महाराष्ट्र शासन

वनविभाग

# उपवनसंरक्षक, सोलापूर वनविभाग, सोलापूर यांचे कार्यालय

"वनभवन" विजापूर रोड,सोलापूर ,413 004.

दूरध्वनी क्रमांक. 0217/2345096,2305982 ई-मेल forestofficesolapur@gmail.com फॅक्स नं.0217/2345096.

जा.क्र.ब/कक्ष-13/मोजणी/ 2961 /2022-23 सोलापूर ,413 004 दिनांक,09 /02/2023.

पत्र.

विषय:- Proposal for diversion of 3.36 ha forest land under section-2 of the Forest (Conservation) Act 1980 for 4 laning of Pune – Solapur Section of NH 9 in Km 144/400 to km 249/000 in the State Of Maharashtra NHDP Phase –III on DBFOT basis – Submission of forest proposal for diversion of forest land into non-forest Reg (FP/MH/ROAD/42876/2019)

प्रति,
मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा),
पुणे.

संदर्भ- 1. मा. अपर प्रधानमुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडिल पत्र क्र. कक्ष17/नोडल/पुणे/ID-13181 (NH)/ 2438, दि. 20/12/2022.
2. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/कक्ष-13/मोजणी/2476, दि. 23/12/2022.
3. प्रोजेक्ट डायरेक्टर, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांचेकडिल पत्र क्र. NHAI/PIU/SLP/NH-65/4478, दि. 31/12/2022 (या कार्यालयास दि. 02/01/2023 रोजी प्राप्त)
4. याकार्यालयाचे पत्र क्रं ब/कक्ष-13/मोजणी/2580 दिनांक 04.01.2023.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सोलापूर ते पुणे या रस्त्यामध्ये सोलापूर वनविभागातील बाधीत 3.36 हे. वनक्षेत्र वळतीकरणाचा वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गतचा प्रस्ताव पाच प्रतीमध्ये वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यांत आलेला होता.सदरचे प्रस्तावामध्ये वरील संदर्भ क्र. 1 अन्वये त्रुटी उपस्थित करण्यांत आलेल्या आहेत. सदर त्रुटीची पुर्तता करणेबाबत या कार्यालयाचे वरील संदर्भ क्र. 2 अन्वये प्रकल्प यंत्रणेस व उपवनसंरक्षक वन्यजीव पुणे यांना अवगत करण्यांत आलेले होते.

प्रकरणी प्रकल्प यंत्रणेकडिल वरील संदर्भ क्र. 3 अन्वये त्यांचेकडिल अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. तो यासोबत जोडला आहे. यामध्ये संदर्भ क्र. 1 अन्वये Wildlife Clearance व Animal Passage Plan नसलेबाबत मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म. रा. नागपूर यांचेकडून त्रुटी उपस्थित करण्यांत आलेली आहे. त्याविषयी प्रकल्प यंत्रणेने त्रुटी पुर्ततेबाबत मुद्या क्र. 1 मध्ये वन्यजीव विभागाच्या 17.07.2010 च्या पत्रान्वये माळढोक पक्षी अभयारण्याच्या क्षेत्रातील रस्त्याच्या 50 मीटर रुंद जागेचे De-notification झाले असल्याचे म्हटले आहे व मुद्या क्र. 2 मध्ये सद्या Animal Passage Plan करणे शक्य नसल्याचे नमुद करण्यांत आलेले आहे. तसेच उपवनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांचा अभिप्राय संदर्भ क्रं 4 अन्वये आपले कार्यालयास देणेबाबत कळविण्यात आलेले आहे.तरी प्रकल्प यंत्रणेकडुन प्राप्त त्रुटी पुर्तता अहवाल आपलेमार्फत मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचे कार्यालयास सादर करणेस विनंती आहे.

(धैर्यशिल पाटील)
उपवनसंरक्षक,
सोलापूर वन विभाग, सोलापूर

प्रतिलीपी- 1. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे वरीलप्रमाणे माहितीसाठी सविनय सादर.
2. उपवनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

Scanned by CamScanner